|

# शिरपूर उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहीरात

**धुळे जिल्हयातील शिरपूर उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (तालुका :-शिरपूर, शिंदखेडा ) गावात पोलीस पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक अमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| ऑनलाईन अर्ज भरण्याचा सुरवातीचा दिनांक | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक :- 04/10/2023 वेळ सकाळी 10.00 वा. पासून | दिनांक :- 15/10/2023 रात्री 23.59 वा. पर्यंत |

**परिक्षा शुल्क खाली प्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग - रुपये 400/- | Online payment पद्धतीने |
| आरक्षीत/ आर्थीक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी - रुपये 300/- | |

**(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)**

फोन पे, गुगल पे, नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्डद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते ऑनलाईन सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेट बँकिंग / डेबिटकार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन होणाऱ्या व्यवहारांची संपुर्णतः जबाबदारी उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिरपूर भाग शिरपूर यास जबावदार असणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात https://ppdhule.mahbharti.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परीक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज/ परीक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया / परिक्षा निकाल स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकूण संख्येत व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेचे संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी शिरपूर यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. शिरपूर उपविभागातील पोलीस पाटलांची रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | गावाचे नांव | आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | शिरपूर | वडेल खु. | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 2 | शिरपूर | भोईटी | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 3 | शिरपूर | बुडकी | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 4 | शिरपूर | चिलारे | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) (महिला) |
| 5 | शिरपूर | काकडमाळ | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 6 | शिरपूर | गधडदेव | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | शिरपूर | हेंद्रयापाडा | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) (महिला) |
| 8 | शिरपूर | हिंगोणीपाडा | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 9 | शिरपूर | हिवरखेडा | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 10 | शिरपूर | फत्तेपूर (क) | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 11 | शिरपूर | अभाणपूर खु. | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 12 | शिरपूर | ममाणे | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) (महिला) |
| 13 | शिरपूर | वरझडी | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) |
| 14 | शिरपूर | वासर्डी | अनुसूचित जमाती (पेसा क्षेत्र) (महिला) |
| 15 | शिरपूर | हिसाळे | इतर मागास वर्ग (पेसा क्षेत्र) |
| 16 | शिरपूर | वाडी बु. | सर्वसाधारण (पेसा क्षेत्र) |
| 17 | शिरपूर | सावेर | अनुसूचित जाती |
| 18 | शिरपूर | सावळदे | अनुसूचित जाती (महिला) |
| 19 | शिंदखेडा | सतारे | अनुसूचित जाती |
| 20 | शिरपूर | भोरखेडा | अनुसूचित जाती |
| 21 | शिंदखेडा | रहिमपूरे | अनुसूचित जाती |
| 22 | शिरपूर | लोंढरे | अनुसूचित जाती (महिला) |
| 23 | शिंदखेडा | अमळथे | अनुसूचित जाती |
| 24 | शिंदखेडा | वरपाडे | अनुसूचित जाती |
| 25 | शिंदखेडा | विखरण | अनुसूचित जाती (महिला) |
| 26 | शिंदखेडा | कलवाडे | अनुसूचित जमाती |
| 27 | शिरपूर | गोदी | अनुसूचित जमाती |
| 28 | शिंदखेडा | भिलाणे दिगर | अनुसूचित जमाती |
| 29 | शिरपूर | तांडे | अनुसूचित जमाती (महिला) |
| 30 | शिंदखेडा | अक्कडसे | अनुसूचित जमाती (महिला) |
| 31 | शिंदखेडा | सुलवाडे | अनुसूचित जमाती |
| 32 | शिरपूर | जातोडे | भटक्या जमाती (क) (महिला) |
| 33 | शिंदखेडा | पाष्टे | भटक्या जमाती (क) |
| 34 | शिंदखेडा | सार्वे | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक |
| 35 | शिंदखेडा | अजंदे खुर्द | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक |
| 36 | शिरपूर | अर्थे खु. | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक |
| 37 | शिरपूर | अर्थे बु. | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (महिला) |
| 38 | शिरपूर | नांथे | सर्वसाधारण |
| 39 | शिरपूर | अजंदे बु. | सर्वसाधारण |
| 40 | शिंदखेडा | पढावद | सर्वसाधारण |
| 41 | शिंदखेडा | बाभळे | सर्वसाधारण (महिला) |
| 42 | शिंदखेडा | दलवाडे प्र.सो | सर्वसाधारण |
| 43 | शिंदखेडा | सोंडले | सर्वसाधारण |
| 44 | शिंदखेडा | अजंदे बु. | सर्वसाधारण (महिला) |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 45 | शिंदखेडा | कामपूर | सर्वसाधारण (महिला) |
| 46 | शिंदखेडा | पाटण | सर्वसाधारण |
| 47 | शिंदखेडा | दाऊळ | सर्वसाधारण (महिला) |
| 48 | शिंदखेडा | शिराळे | सर्वसाधारण |
| 49 | शिंदखेडा | निमगुळ | सर्वसाधारण |
| 50 | शिरपूर | जुने भामपूर | सर्वसाधारण (महिला) |
| 51 | शिंदखेडा | पिंपरखेडा | सर्वसाधारण |
| 52 | शिंदखेडा | दभाषी | सर्वसाधारण |

- **पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता :-**

| संवर्ग (पदनाम) | |
|---|---|
| | 1. अर्जदार हा दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.<br>2. (अ) वयोमर्यादे करीता अर्जदारचे दिनांक 04/10/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.<br>(ब) अर्जदाराचे वय दिनांक 04/10/2023 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.<br>(क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.<br>3. अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवासी असावा. (अर्जदाराने रेशन कार्ड, निवडणूक कार्ड, पत्याचा उल्लेख असलेले ओळखपत्र, ज्या गावातुन अर्ज सादर करणार आहेत त्या गावाचे आधारकार्ड, स्वयंघोषणापत्र किंवा ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते, अशा कोणत्याही एका पुराव्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील व मुलाखतीचे वेळी मूळ पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)<br>4. अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.<br>5. अर्जदार शारीरिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.<br>6. महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)<br>7. मागासप्रवर्गासाठी आरक्षीत पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.<br>8. मागासप्रवर्गातील उमेदवार (वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व.) यांना सन 2023-24 या कालावधी करीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.<br>9. मागासप्रवर्गातील उमेदवार (वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व.) या प्रवर्गातील महीला पदासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2023-24 या कालावधी करीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. |

- **परीक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परीक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

Scanned with OKEN Scanner

- **<u>लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील</u> :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल. (80 प्रश्न)
2. लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3. लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल यात सामान्यज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4. लेखी परीक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र. क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करावा लागेल.
6. लेखी परीक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील तोंडी परीक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. मात्र एखादया उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.

- **<u>निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-</u>**

1. अर्जदाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता संदर्भातील व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील अन्यथा तोंडी परीक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2. लेखी परिक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. चे वेळापत्रक तसेच प्रवेशपत्र व विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3. लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
4. अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारीत्र्य प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

6. अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे तो इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा व ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा. याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7. पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यास प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक आरक्षणाचा असला पाहिजे.

8. अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवांसी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

11. संपूर्ण धुळे जिल्हयात शिरपूर उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.

12. संपूर्ण भरती प्रक्रिया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

13. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

14. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारिरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदासाठी कोठलेही समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

15. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्ववि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

16. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ 2023/प्र.क्र.223/कार्या-2 दि.4 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडीकरिता नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

17. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.अन्यथा उमेदवारांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल
18. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांना विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.
19. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराने मुलाखत दिल्यानंतर मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरीता पात्र राहील.
20. समान गुण मिळाल्यास शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.
    1) पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर (पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही )
    2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर
    3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर
    4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार
21. याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय व परिपत्रके तसेच नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.
22. हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यात येईल.

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :-**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त https://ppdhule.mahbharti.com या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण भरल्याने संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिरपूर भाग शिरपूर हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
2. पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://ppdhule.mahbharti.com या वेबसाईटद्वारे दि. 04/10/2023 ते दि. 15/10/2023 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक

Scanned with OKEN Scanner

संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

4. उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल.

5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://ppdhule.mahbharti.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी प्रक्रीया शुल्क भरण्याकरीता नेट बँकींग, डेबीट कार्ड/ क्रेडीट कार्ड वापरुन होणाऱ्या व्यवहाराची संपुर्णत: जबाबदारी उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, शिरपूर यास जबाबदार असणार नाही.

6. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना स्वत:चा विहीत नमुन्यातील अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन https://ppdhule.mahbharti.com मधील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

7. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेत स्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

8. ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा /वेळापत्रक /परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती नमूद केलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

9. ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

10. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागतील.

11. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

12. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ 2023/प्र.क्र.223/कार्या-2 दि.4 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरिता नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसुचित जमांती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

13. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12 दि.28 मार्च 2005 व शासन परीपत्रक एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ ब क ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञा पत्राचा नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
14. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
15. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
16. अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.
17. परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे.
18. अर्जदाराने भरती प्रक्रीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.
19. उमेदवाराने भरलेले परिक्षा शुल्क त्यास कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही
20. उमेदवारांना लेखी परिक्षेला **व कागदपत्रे पडताळणीकामी** उपस्थित राहण्यासाठी **कोणताही** प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही
21. वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

दिनांक 03/10/2023
ठिकाण : शिरपूर

3.10.23
(प्रमोद भामरे)
**उपविभागीय दंडाधिकारी, शिरपूर**
**तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती - 2023**

Scanned with OKEN Scanner

## उपविभागीय दंडाधिकारी शिरपूर भाग शिरपूर यांचे कार्यालय, जिल्हा धुळे
## पोलिस पाटील पदभरतीसांठी जाहिरात 2023

धुळे जिल्हयातील शिरपूर उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, शिरपूर भाग शिरपूर कार्यालयांतर्गत गाव पोलिस पाटील पदभरतीसाठी अर्हता धारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://ppdhule.mahbharti.com या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**शिरपूर उपविभागातील पोलिस पाटील संवर्गातील एकूण रिक्त पदे - 52**

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 04 /10/2023 वेळ सकाळी 10 - 00 वा. पासून | दिनांक 15/10/2023 रात्री 23.59 वा. पर्यंत |

पोलिस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात https://ppdhule.mahbharti.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहीती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित चलनाव्दारे भरलेले प्रक्रिया शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/ परीक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये वाढ किंवा घट, आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, शिरपूर भाग शिरपूर यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

दिनांक :- 03/10/2023
ठिकाण :- शिरपूर

3-10-23
( प्रमोद भामरे )
**उपविभागीय दंडाधिकारी, शिरपूर**
**तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती - 2023**

Scanned with OKEN Scanner